एकमेव नि:पक्ष वृत्तपत्र

# महाराष्ट्र टाइम्स

मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी 18001200004 वर कॉल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.

नागपूर । मंगळवार, २२ नोव्हेंबर २०२२ । पाने १० + ४ (नागपूर प्लस) । शहर आवृत्ती । ₹ ४.००



## राजेंद्र महाविद्यालयात सायबर जागरुकता कार्यक्रम

**नागपूर :** डिजिटल जगामुळे काम अगदी सोपे झाले आहे. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन असल्याने ऑनलाइन व्यवहार वाढले आहेत. त्यामुळे सायबर गुन्हे हा अतिशय चिंताजनक विषय झाला आहे. या पार्श्वभूमीवर सायबर जागरुकता वाढविण्याच्या उद्देशाने न्यायसाहाय्यक विज्ञान संस्था (इन्स्टिट्युट ऑफ फॉरेन्सिक सायन्स) आणि क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजेंद्र महाविद्यालयात 'सायबर जागरुकता' हा कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मैत्रेयी घनोटे, पूर्वा चतारे या विद्यार्थिनींनी इन्स्टिट्युट ऑफ फॉरेन्सिक सायन्सचे संचालक डॉ. रामदास अत्राम, विभागप्रमुख डॉ. आशिष बढीये, डॉ. नीती कपूर, हन्सी बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. यावेळी प्राचार्य नीता जाधव, रंजना चौधरी आदींची उपस्थिती होती.